# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.12.2025** **वारःरविवार**

---

• महापरिनिर्वाणदिनानिमित्त देशभरात हजारो अनुयायांकडून बाबासाहेबांना अभिवादन.

•नागपूरमध्ये उद्यापासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात.

•इंडिगोच्या रद्द झालेल्या उड्डाणांसाठी प्रवासभाड्याची विनाविलंब परतफेड करण्याचे नागरी विमान वाहातूक मंत्रालयाचे निर्देश.

•पुण्याच्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेला उत्साहात सुरुवात; महिला गटात चिपळूणची साक्षी जड्याळ विजेती.

आणि

•दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पन्नास षटकांच्या मालिकेत भारताचा दमदार विजय.

इंट्रो-महापरिनिर्वाणदिन

संविधानकर्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त काल राज्यभरातून हजारो अनुयायांनी त्यांना अभिवादन केले. मुंबईतही हजारो अनुयायांच्या उपस्थितीत दादरच्या चैत्यभूमीवर अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं होतं.  राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनीही आंबेडकरांना अभिवादन केलं. यावेळी बोलताना, भारतासारख्या विविधता असलेल्या देशामध्ये एकता, न्याय आणि संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधानाची निर्मिती करणं हे मोठं ऐतिहासिक कार्य बाबासाहेबांनी केल्याचं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. राज्यपाल म्हणाले,

बाबासाहेबांनी समतेची जाणीव दृढ केल्याचं नमूद करुन, ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रातील बाबासाहेबांचे योगदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधोरेखित केले. त्यांच्यामुळेच राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना देशाने वेळेत स्विकारल्यानं आज ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारताच्या लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण संविधानामुळे होत असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष उभारल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले. राज्यसरकारच्यावतीनं दादर चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. तसंच पोलिस विभागानेही बाबासाहेबांना मानवंदना दिली.

मुंबईत विधानभवनात उपसभापति डॉक्टर नीलम गोऱ्हे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी तर नागपूरच्या विधानभवनात अभिवादन कार्यक्रमात विधान मंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार वाहून अभिवादन केलं. नागपूरातही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीक्षाभूमीला भेट दिली तर विविध बुद्धविहारांमध्ये हजारो अनुयायांनीही बाबासाहेबांना अभिवादन केले. राज्यात सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. अकोल्यात मध्यरात्री मेणबत्ती फेरी काढून महामानवाला अभिवादन केलं तर अशोक वाटिकेत रक्तदान शिबिराचं आयोजित करण्यात आलं होतं. वाशिममध्येही मेणबत्ती फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. गेल्या १८ वर्षांपासून ही फेरी आयोजित करण्यात येते. त्याशिवाय सांगली नाशिक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अकोला, धाराशिव इथंही अनुयायांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. लातूरमधील पानगावमध्ये असलेल्या बाबासाहेबांच्या अस्थिंना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली होती. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातमहापरिनिर्वाण दिनी विशेष व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं होतं. पिंपरी चिंचवडमध्येही मुख्य प्रशासकीय इमारतीसह शहरांत विविध ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. यानिमित्त भंडारा जिल्ह्यात रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. नवी मुंबईत ऐरोलीतल्या ज्ञानस्मारकाला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी भेट देऊन अभिवादन केलं.

**देशबाबासाहेब**

देशभरातही काल बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि इतर केंद्रीय मंत्र्यांसह मान्यवरांनी आंबेडकरांच्या पुतळ्याला संसद भवनाच्या आवारात पुष्पहार वाहून अभिवादन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात, बाबांसाहेबांच्या दूरगामी नेतृत्व आणि न्याय, समानता आणि संविधानात्मक मूल्य आजही देशाला मार्गदर्शक ठरत असल्याचं नमूद केलं आहे.

**<u>डिजीटलचित्ररथ</u>**

संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीनं साकारलेल्या चित्ररथाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत काल उद्घाटन करण्यात आलं. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. हा चित्ररथाच्या माध्यमातून संविधानाची माहिती, संविधानच्या मूलतत्वावरील माहिती, लोकशाही मूल्यांचे कलात्मक सादरीकरण तसंच प्रदर्शन पाहायला मिळणार आहे. हा रथ राज्यभर फिरणार आहे.

**<u>विधि मंडळ चहापान</u>**

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपुरात सुरू होत आहे. या पार्श्वभुमीवर आज संध्याकाळी नागपुरात मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या रामगिरी निवासस्थानी विरोधी पक्षनेते, गटनेते आणि विधीमंडळ सदस्यांना चहापानासाठी आमंत्रित केलं आहे. त्यानंतर ते पत्रकार परिषद घेतील.

**<u>परीक्षापेचर्चा</u>**

परीक्षेचा ताण दूर करत जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून हा काळ कसा साजरा करता येऊ शकतो हा दृष्टीकोन देणारा परीक्षा पे चर्चा या संवादात्मक कार्यक्रमाच्या ९व्या आवृत्तीचे आयोजन नव्या वर्षात जानेवारीमध्ये करण्यात येणार आहे. या माध्यमातून भारतातील तसेच परदेशातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्याशी पंतप्रधान संवाद साधतात, त्या विषयीचा हा वृत्तांत.. . .

**<u>व्हीसी</u>**

***परीक्षे पे चर्चा या पंतप्रधानांच्या विद्यार्थी, शिक्षक संवादाची सुरुवात २०१८मध्ये झाली. त्यावेळी २२ हजार विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असल्याचं दिसून येत. २०२५मध्ये आठव्या आवृत्तीत साडेतीन कोटी जणांनी नोंदणी केली होती त्यावरून हे स्पष्ट होते. या आवृत्तीने, २४५ हून अधिक देशांमधील विद्यार्थी, १५३ देशांतील शिक्षक आणि १४९ देशांतील पालकांच्या सहभागाने गिनिज बुक वर्ल्ड रेकॉर्डही प्रस्थापित केले आहे. जानेवारी २०२६मध्ये होणाऱ्या नव्या आवृत्तीमध्ये सहभागी होण्यासाठी १ डिसेंबरपासून ११ जानेवारी २०२६ या कालावधीत माय जीओव्ही पोर्टलवर ऑनलाईन बहुपर्यायी प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये सहावी ते १२वी पर्यंतचे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक यांना सहभागी होऊ शकतील. हा उपक्रम पूर्ण***

***करणाऱ्या सर्व नोंदणीकृत सहभागींना मायजीओवीकडून सहभागचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी विजयालक्ष्मी साळवी पुणे.***

**इंडिगो**

इंडिगो विमान कंपनीच्या रद्द झालेल्या उड्डाणांसाठी सर्व प्रवाशांच्या प्रवासभाड्याची परतफेड विनाविलंब करण्याचे निर्देश नागरी विमान वाहातूक मंत्रालयानं काल दिले आहे. आज रात्रीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याबरोबरच ज्या प्रवाशांच्या प्रवास नियोजनावर याचा परिणाम झाला आहे, त्यांच्याकडून पुनर्निधारण शुल्क आकारू नये असेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशांचे पालन न केल्यास अथवा विलंब झाल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. इंडिगोच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.

दरम्यान, विमान उड्डाणं रद्द झाल्यानंतर प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे विभागानं सुलभ प्रवास आणि पुरेसा निवास व्यवस्था उपलब्ध करण्याच्या उपाययोजना केल्या आहेत.

**न्यायकृबु**

न्यायलयीन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अत्यंत सावधिगिरीनं केला जात असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायदानावर तंत्रज्ञान नियंत्रण ठेवू शकणार नाही यावरही भर दिला.

**अभामसा**

सातारा इथं होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**मॅरॉथॉन**

३९ व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या ४२ किलोमीटरच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये इथोपियाचा हैमानुत आगेन्यू विजेता ठरला. तर इथोपियाचाच डेरेज्जे अलेमो उपविजेता ठरला आहे. तर लष्कराचा खेळाडू तीर्थ कुमार पून हा

आंतरराष्ट्रीय गटात तिसरा तर भारतीय गटात पहिला आला. तर महिला गटात पूर्ण मॅरेथॉनची विजेती ठरलेली चिपळूणची साक्षी जड्याळ आकाशवाणीशी बोलताना म्हणाली. . . . . . .   .

**<u>क्रिकेट</u>**

विशाखापट्टणम इथं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या तिसऱ्या आणि निर्णायक मर्यादित षटकांच्या सामन्यात काल भारताने ९ गडी आणि १० षटके राखून दमदार विजय नोंदवत मालिका २-१ अशी जिंकली. भारताने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केलं. दक्षिण आफ्रिकेने क्वीटन डीकॉकच्या शतकी खेळीच्या जोरावर २७० धावा केल्या होत्या. युवा सलामीवीर यशस्वी जयस्वालने नाबाद ११६ धावांची खेळी करत मर्यादित षटकांच्या कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. तत्पूर्वी कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ गडी बाद केले. आता येत्या 9 डिसेंबर पासून वीस षटकांची ५ सामन्यांची मालिका सुरू होत असून मालिकेतील पहिला सामना कटक इथं होणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र सूर्यप्रकाश युक्त कोरडं हवामान राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**